ललिता गंडभीर
65 Oxford Rd.
Newton, MA 02459
U.S.A.
617 – 308 -3045
lalitagandbhir@hotmail.com

# Face of Female Poverty

मी अपार्टमेंट काँप्लेक्ससमोरच्या पांढऱ्याशुभ्र आडव्याउभ्या लाकडी फळ्यांच्या कुंपणाबाहेर उभी. कुंपणाला छोटा दरवाजा. त्यातून आत जाणारी पायवाट. पायवाटेच्या टोकाला मोठं लांबट कारंजं. त्यात पोहोणारे सूर्यप्रकाशात चमकणारे लाल, चंदेरी मासे, मधून मधून पसरलेली हिरवी गोलाकार पानं व त्यातून उमललेली रंगीबेरंगी लिलीची फुलं. कारंज्याभोवती हिरवळ. मुख्य पायवाटेला दोन्ही बाजूने येऊन मिळणाऱ्या समांतर छोट्या पायवाटा. शेजारी हिरवळीचे व फुलझाडांचे चौकोन व बाजूला मिलिटरी बरॅकसारख्या दिसणाऱ्या कौलारू अपार्टमेंटस्च्या लांबच लांब चार ओळी. पुढे पडव्या, त्यात खुर्च्या, फुलझाडं. त्या ओळींच्यामधे हिरवळ. हिरवळीत मोठे मोठे वृक्ष.

'सहा महिन्यांसाठीच राहायचंय. ही जागा छान दिसतेय. इथे अपार्टमेंट मिळूदे. एक बेडरूमपण चालेल.' असं मनात म्हणत मी फाटक उघडून आत गेले आणि 'ऑफिस' अशी पाटी लावलेल्या उजव्या बाजूच्या अपार्टमेंटवरच्या दरवाजावरची घंटी वाजवली.

एका मध्यमवयीन, किडकिडीत, काळ्या केसांच्या उंच बाईने दार उघडलं. तिच्या कपाळावर आठ्या आणि वैताग होता.

"काय हवंय?"

"अपार्टमेंट."

तिचा चेहेरा निवळला. खोटं का होईना, मंद स्मित करत तिने मला आत बोलावले. 'बस' म्हणून खुर्चीकडे बोट दाखवलं.

"मला वाटलं कुणीतरी तक्रार घेऊन आलं. इथे राहणारे भाडेकरू लहानसहान दुरुस्तीसाठी तक्रारी करतात."

'आपण इथे राहायला आलो व तक्रार केली तर आपलं असंच स्वागत होईल' मनात विचार आला. ती बोलतच होती, "माझं नाव रुथ. इथे एकदा राहायला आलेलं माणूस दोनच मार्गांनी बाहेर पडतं. नर्सिंग होम किंवा ..." तिने आकाशाकडे बोट दाखवलं आणि म्हणाली, "आत्ताच एक बाई नर्सिंग होममधे गेली. नाहीतर इथे अपार्टमेंट क्वचितच मिळतात. पण तू भाग्यवान आहेस. तिचा एक बेडरूमचा अपार्टमेंट एका आठवड्यात तयार होईल, तो तुला मिळेल."

'हे कसलं भाग्य!' मी मनात म्हटलं आणि रुथला विचारलं, "अपार्टमेंट बघता येईल?"

"नाही. पण फोटो दाखवते."

"लीज?"

"इथे लीज नाही. महिन्याची नोटीस दिली की झालं."

लीज नाही म्हणून मी खूष. सगळीकडे वर्षाचं लीज होतं. आम्ही तर सहाच महिने राहणार होतो.

मी फोटो पाहिले. मनात म्हटलं, 'फक्त फोटो बघून लग्नपण ठरवतात. आपण तर अपार्टमेंट भाड्याने घेतोय."

मग रुथने इतर चौकशा केल्या.

'वय?' 'नवरा का बॉय फ्रेण्ड?' 'मुलं?' 'आवक?' इत्यादी.

मधेच 'हा कॉम्प्लेक्स फक्त पंचावन्नच्या वरच्या स्त्रीपुरुषांसाठी आहे' अशी माहिती दिली.

मी फारसा विचार न करता डिपॉझिटचा चेक लिहून दिला. तिने दिलेला फॉर्म घेऊन कॉम्प्लेक्समधे इकडे तिकडे हिंडले. आणि हॉटेलात परतले.

हॉटेलात मी फॉर्म भरला. संध्याकाळी रोहितसमोर ठेवला, "सही कर."

"जागा चांगली आहे का?"

"बघितली नाही." मी सांगितलं. "भोवतालची झाडी, बरॅकसारखे अपार्टमेंटस्, कारंजं, त्यातली कमळं, मासे, फुलझाडं सगळं मला आवडलं म्हणून डिपॉझिट दिलं."

कपाळावर हात मारत तो म्हणाला, "बाटली छान म्हणून शांपू घेतेस तसाच हा प्रकार आहे. तू तर भोवतालचं जंगल छान म्हणून झोपडी पण भाड्याने घेशील."

"लीज नाही. भाडं कमी आहे." मी त्याची समजूत घालण्यासाठी म्हटलं.

"दे तो फॉर्म. मी अंगठा उठवतो. तू काय हवं ते कर. नाही तरी मी कामावरच असणार." अशी बडबड करत त्याने सही केली.

एक आठवडा हॉटेलमधे राहून आम्ही नुकत्याच पेंट केलेल्या अपार्टमेंटमधे पोचलो. पुढे छोटं अंगण. माझ्या अंगणात थोडी फुलझाडं. शेजारणीची सुंदर बाग. नंतर शेजारणीची आणि माझी कौलारू पडवी. आत अपार्टमेंटच्या लांबीएवढी लिव्हिंग/डायनिंग रूम, बाजूला एक बेडरूम व बाथरूम. डायनिंग रूमच्या बाजूला छोटं स्वयंपाकघर. मागे कुंपण घातलेलं छोटं अंगण. मी खूष. कोकणात पोचल्यासारखं वाटलं.

आम्ही तिथे पोचताच शेजारीण 'वेलकम वेलकम' म्हणत जेवण घेऊन आली, "मी कॅरलिन. काही लागलं तर सांगा. आत्ता मला जायला हवं. संध्याकाळी सूझी डिनर आणून देणार आहे."

तिचे आभार मानत आम्ही आमची ओळख करून दिली. ती घाईघाईने कुठे तरी "मला जायला हवं" म्हणत निघून गेली.

आम्ही कॅलिफोर्नियात सहा महिन्यांसाठी दोन सूटकेसेस घेऊन पोचलो होतो. एका सूटकेसमधे कपडे व दुसरीत कामाचे कागद.

संसार सुरू करायचा म्हणजे थोडंतरी सामान घेणं भागच होतं. आम्ही त्या दिवशी दुपारी भराभर खरेदी केली. भांडी, ग्रोसरी घेतली व घरी परतलो.

संध्याकाळी सूझीने जेवण आणून दिलं. "नंतर भेटू" म्हणून तीही निघून गेली.

त्या बायकांनी विचारपूर्वक व्हेज जेवण दिलं होतं.

दुसऱ्या दिवशी मी सामान लावलं आणि साधा स्वैपाक करायला सुरवात केली.

रुथ एक छोटी आफ्रिकन व्हायोलेटची कुंडी घेऊन भेटायला आली. तिने कॉम्प्लेक्सच्या कार्यक्रमांची यादी माझ्या हातात दिली.

मी त्या कागदावर नजर टाकली.

कॉम्प्लेक्सच्या क्लबहाऊसमधे रोज दुपारी सिनेमा दाखवतात. आठवड्यातून एकदा बसने किराणा माल घेण्यासाठी जाणं, मधूनमधून बिंगो, लेक्चरस्, फॅशन शो, प्रेक्षणीय स्थळी किंवा नाटकाला जाणं असे कार्यक्रम रहिवाशांसाठी होत असत.

माझ्या ओळखी होऊ लागल्या. रहिवाशी एकमेकांना खूप मदत करतात, वृद्धांची काळजी घेतात हे माझ्या लक्षात आलं.

मग एक विचित्र अनुभव आला. मी एक तारखेला भाड्याचा चेक चुकून पाच डॉलरने कमी लिहिला व तो द्यायला ऑफिसमधे गेले. रुथ ऑफिसमधे बसली होती. तिने मी पुढे केलेल्या चेकवर नजर टाकली आणि म्हणाली, "पाच डॉलर कमी आहेत."

"सॉरी. तो चेक दे. मी दुसरा आणून देते." मी म्हटलं.

"नको. नको. तुझ्याकडे कॅश आहे का?"

"नाही. खिशात चिल्लर आहे. मी कॅश आणून देते."

"नको. खिशात आहे ते दे."

मी खिशातून एका डॉलरच्या तीन नोटा आणि चिल्लर काढली.

"ते चालेल." ती म्हणाली.

तिने आणि मी चवल्या पावल्या मोजल्या. जेमतेम पाच डॉलर झाले. ती खूष झाली. मी जाता जाता रुथ पुटपुटली, "अग, इथली माणसं प्रत्येक पेनीसाठी जीव टाकतात. एकदा जाऊ दिलं तर परत येतील न येतील!"

रुथचं वागणं आणि शेवटी तिने मारलेला शेरा मला खटकला.

'मी मुद्दाम पाच डॉलरने कमीच चेक लिहिला असं तिला वाटलं का?' 'कदाचित ते तिच्या लक्षात येणार नाही असा विचार करून तिला फसवण्याचा माझा हेतू होता अशी तिची समजूत झाली का?' 'का खरंच ती बोलत होती तशी वस्तुस्थिती इथे आहे?' माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झाली.

घराबाहेरच शेजारीण, कॅरलिन भेटली. "आज एक तारीख ना? ती रुथ ऑफिसात ठिय्या देऊन बसली असेल. एरवी बेपत्ता असते." अशी तक्रार करत ती हातात चेक घेऊन ऑफिसमधे जायला निघाली होती.

"ते तिचं काम आहे." मी रुथची बाजू घेतली.

"आपल्या घरांच्या दुरुस्त्या करून घेणं पण तिचं काम आहे. त्याची कशी टाळाटाळ करते ते बघ. आज ना उद्या तुला चटका बसेलच." तणतणत कॅरलिन चेक द्यायला गेली.

मी धुण्याचे कपडे एका अम्प्यात भरून, क्वार्टरस् घेऊन लाँड्रीरूममधे गेले.

लाँड्रीरूम एका लांबट खोलीत होती. एका भिंतीलगत चार वॉशरस् तर दुसऱ्या भिंतीलगत चार ड्रायरस् असं त्या खोलीचं स्वरूप होतं. त्या खोलीत कपडे धुण्याच्या साबणाचा व वाळणाऱ्या कपड्यांचा वास व वाफ भरून सांडत असे. मला तो वास आवडत नसे म्हणून भरकन आपलं काम आवरून तिथून बाहेर पडण्याचा माझा प्रयत्न असे. पण त्या लाँड्रीरूममधे रहिवाशी भेटत असत व फालतू गप्पा सुरू होऊन मी तिथेच अडकत असे.

आजही तसंच झालं.

मी लाँड्रीरूममधे पोचले तेव्हा एक बाई ड्रायरकडे बघत संभ्रमात उभी होती.

मी तिथे पोचताच मी माझी ओळख करून दिली, "मी शमा" मी क्षमाचं शमा केलं होतं.

"मी जॅनेट" ती म्हणाली. मग मला न्याहाळून बोलली, "तू इथे नवी दिसतेस."

मी वॉशिंग मशिनमधे कपडे भरत म्हटलं, "नुकतेच आम्ही इथे राहायलाआलो."

"शमा, मी या ड्रायरमधे तीन क्वार्टरस् टाकले. पण तो सुरू होत नाही. मी चटकन ऑफिसमधे जाऊन ड्रायर का चालत नाही ते विचारून येते. मी परत येईपर्यंत तू इथे थांबशील का?"

मला थांबणं भाग पडलं. "थांबते" मी म्हटलं.

"कुणी कपडे चोरत नाही पण लोकं कपडे बाहेर काढतात, इकडे तिकडे ठेवतात, कपडे मिसळतात, हरवतात."

"जा ना. मी थांबते. रुथ ऑफिसमधे आहे." मी सांगितलं.

"आज असणारच." असं म्हणत जॅनेट ऑफिसच्या दिशेने गेली. मी बाहेरच्या पायरीवर बसून राहिले.

लवकरच ती हातात नाणी खुळखुळवत परतली.

"काय झालं?"

"कपडे वाळवण्यासाठी एक क्वार्टर वाढला."

"मग हा घे. माझ्याकडे एक जास्त आहे." मी माझ्याकडचा एक क्वार्टर तिच्यापुढे धरला.

"नको" तिने सुस्कारा टाकला आणि मग ती आपले ओले कपडे ड्रायरमधून काढून लॉंड्री बास्केटमधे भरू लागली. "मी रुथीकडून तीन क्वार्टरस् परत आणले. मला आणखी एक क्वार्टर परवडणार नाही. एरवी मी कपडे अंगणात दोरीवरच वाळवते. पण या चादरी बाहेर वाळवणं जरा कठीण जातं म्हणून ड्रायरमधे घालत होते. क्वार्टर वाढवला तर नोटिस नको का लावायला?"

जॅनेट बोलत होती पण मी 'क्वार्टर परवडणार नाही' या वाक्यावर अडकले होते.

जॅनेट किती वर्षांची होती कोण जाणे! तिचे पिकलेले केस तिने मागे वळवून छोट्याशा पोनीटेलमधे बांधलेले होते. प्रत्येक केस जागच्या जागी होता. चेहेऱ्यावर हलकासा मेकअप होता. तिचं सरळ नाक, निळे डोळे, भरीव जिवणी, कोरलेल्या भुवया, एखाद्या तरुणीसारखा कमनीय म्हणता येईल असा बांधा आणि तिचं बोलणं वागणं मध्यम वर्गीय ते उच्च मध्यम वर्गीय स्त्रीचं होतं. 'अशा बाईवर या वयात पैसा, पैसा मोजण्याची पाळी का यावी?' ह्या प्रश्नाचा भुंगा माझ्या मनात पिंगा घालत होता.

जॅनेट गेली पण साबणाचा वास विसरून मी 'जॅनेटचा आणि तिच्याकडे पैसे का नाहीत?' या विषयाचा विचार करत पायरीवर बसून राहिले.

तेव्हढ्यात मला लाँड्रीरूमच्या दिशेने एक लाल केसांची, मध्यम उंचीची हसरी बाई येताना दिसली.

"हॅलो,हॅलो! मी मॉली." तिने आपली ओळख करून दिली.

"मी शमा." मी म्हटलं.

"मी जॅनेटला शोधतेय."

"क्वार्टर वाढला म्हणून जॅनेट तिचे ओले कपडे घेऊन तिच्या घरी गेली."

"क्वार्टर वाढला?" त्या बाईच्या हसऱ्या चेहेऱ्यावर क्षणभर काळजी उमटली. "आता तिला मी शोधत नाही. तीच येईल इथे. आम्हाला लवकर निघायला हवं. आज ग्रोसरीच्या दुकानात जुना ब्रेड स्वस्तात विकतात. तो आम्ही घेतो. आम्हाला उशीर झाला तर विकला जाईल." माझ्या शेजारी पायरीवर बसत ती म्हणाली.

"ग्रोसरीच्या दुकानात? ते तर लांब आहे."

"दोन मैल."

"तुम्ही कशा जाणार?"

"चालत. गेल्या वर्षीपर्यंत आम्ही दोघींनी एक कार ठेवली होती. पण मग गॅस परवडेना म्हणून ती विकली." मॉली हसत बोलत होती. "थोडं दमायला होतं. पण अजून चालता येतंय."

तेव्हढ्यात जॅनेट येताना दिसली.

"निघते. बाय. सी यू." म्हणून मॉली गेली सुद्धा.

मी माझे वॉशिंगमधे धुतलेले कपडे ड्रायरमधे घातले. शेवटचा क्वार्टर टाकताना माझा हात अडखळला.

घरी परतले आणि पडवीत बसून राहिले. कॅरलिन कुठून तरी आली.

"आज दुपारी बारा वाजता क्लबहाउसमधे लंच आणि केक वॉक आहे. मजा येईल. जरूर ये."

"केक वॉक म्हणजे काय ते मला माहीत नाही, पण नक्की येईन." मी तिला आश्वासन दिलं.

सँडविचेस व सूपची लंच होती. लंच व कॉफी झाल्यावर केक वॉकचा कार्यक्रम सुरू झाला. जॅनेट केक वॉकची सूत्रधार होती. मॉली तिला मदत करत होती.

हातात जुन्या काळचा कपडे धुण्याचा बोर्ड घेऊन जॅनेटने सुरवातीला लहानसं भाषण दिलं, "केक वॉकचा कार्यक्रम प्लांटेशनस्‌वरती स्लेव्हज्‌नी सुरू केला. हा बोर्ड ताल धरण्यासाठी वापरला जात असे." जॅनेटने कपडे धुण्याच्या बोर्डावर ताल वाजवून दाखवला. "त्या तालात स्लेव्हज्‌ त्यांच्या मालकांच्या वागण्याची, बोलण्याची व चालून दाखवण्याची संगीत नक्कल करत असत. जो कुणी उत्तम नक्कल करेल त्याला केक बक्षीस मिळत असे. कधी कधी मालकही केक वॉक बघायला येत असत. पण त्यांना स्लेव्हज्‌ आपली नक्कल करतायत हे माहीत नसायचं."

नंतर केक वॉक झाला. तो म्युझिकल चेअरसारखा होता. जमिनीवर खडूने चौकोन काढून त्यात आकडे लिहिले होते. म्युझिक सुरू झालं की त्या चौकोनांवर भराभर चालायचं. म्युझिक थांबलं की जॅनेट एका टोपीतून एक चिठ्ठी उचलायची. त्या चिठ्ठीवरच्या आकड्याला बक्षीस म्हणून जाहीर करायची. मग त्या आकड्यावरच्या व्यक्तीला छोटा केक, पाय असं बक्षीस मिळायचं. (हा केक वॉक स्लेव्हज्‌च्या केक वॉक सारखा नव्हता.)

जॅनेट अगदी कुशलतेने विनोद सांगत सूत्रधाराचं काम करत होती. सगळे खुशीत होते. कार्यक्रम संपल्यावर मी जॅनेटला म्हटलं, "खूप मज्जा आली. तू तुझं काम मोठ्या हुशारीने केलंस."

जॅनेट म्हणाली, "थँक यू. मला सवय आहे. मी आणि मॉलीने असे खूप कार्यक्रम केलेत."

सगळे आपला केक कापून बक्षीस न मिळालेल्यांना देत होते. मी माझा अॅपल पाय कापून वाटत होते. वातावरण उत्साही होतं.

आता रुथ पुढे सरसावली, "मालकाने एक नोटिस वाचून दाखवायला सांगितलं आहे." ती म्हणाली, "पुढच्या महिन्यापासून भाडं साठ डॉलर्सने वाढणार आहे."

खोलीतला हसण्याखिदळण्याचा आवाज एकदम थांबला. प्रथम शांतता झाली. मग मात्र खोलीत खळबळ माजली. मी जॅनेटकडे पाहिलं. तिचा चेहेरा काळवंडला होता.

मी ड्रायरमधले कपडे विसरलेच होते. घाईघाईने लॉंड्रीरूममधे गेले. कुणीतरी कपडे घड्या करून बाजूच्या टेबलावर ठेवले होते.

मी कपडे घेऊन परतले. वाटेत रहिवाशी पुंजक्याने बोलत होते. मी पडवीत पोचले तेव्हा कॅरलिन आणि एक बाई पडवीत बोलत होत्या. मला कॅरलिन म्हणाली, "रुथी तुला भेटायला आली होती. तिने तुला ऑफिसात बोलावलं आहे."

मी माझं कपड्यांचं गाठोडं घरात फेकलं आणि ऑफिसमधे गेले. रुथ तिच्या डेस्कसमोर बसली होती.

"हाय शमा, ही भाडेवाढ तुमच्यासाठी नाही. तुमचं भाडं आधीच वाढवलं आहे."

"गुड!" मी म्हटलं आणि रुथला विचारलं, "ही भाडेवाढ कितीजणांना परवडण्यासारखी आहे?"

"हा कॉम्प्लेक्स सरमिसळ आहे. काहीजण सुस्थितीत आहेत. सुरक्षित वाटतं म्हणून इथे राहतात. इथे रात्री पोलिस फेऱ्या मारतात. रखवालदार आहे. काही बायका, बहुतेक विधवा, इथे खूप वर्ष आहेत. त्यांना पैसे कमी पडतात. घरमालक काय करणार? त्याचे पण खर्च वाढतात. सगळे भाडेकरू माझ्यावर भडकतात. पण मी काय करू? मी घरमालकाची आज्ञा पाळते."

मी मान डोलवत म्हटलं, "समजलं" आणि मी घरी परतले.

आता कॅरलिन एकटीच पडवीत बसली होती. "काय म्हणाली रुथी?" तिने विचारलं.

"आमचं भाडं आधीच वाढवलं होतं."

तिने सुस्कारा टाकला. "आता आपला शेजार महिन्यापुरता" तिने सांगितलं.

"का?" मी बैठक मारत विचारलं.

"साठ डॉलर भाडेवाढ मला परवडणार नाही. मी सेक्रेटरी होते. लग्न केलं नाही. काटकसरीने राहिले. पण रिटायर झाल्यावर साठवलेले पैसे हळूहळू खर्च झाले. म्हणजे काहीतरी अटळ कारणाने खर्च करावे लागले. अगदी थोडे उरलेत. ते मला खर्च करायचे नाहीत. माझ्या सोशल सिक्युरिटीत भागवण्याचा मी प्रयत्न करतेय. आत्ताच सोशल सिक्युरिटीचे पैसे मला जेमतेम पुरतात. त्यातले साठ डॉलर भाड्याला दिले तर मला उपाशीच राहायला पाहिजे."

"मग तू कुठे राहायला जाणार?"

"मी अफोर्डेबल अपार्टमेंटसाठी अर्ज केलाय. तो मिळेपर्यंत मी माझ्या मैत्रिणीकडे राहणार आहे. तिच्या सोफावर झोपीन. तिला थोडे पैसे देईन. तिलाही मदत होईल, पण स्वातंत्र्य जाईल. काय करणार? इलाज नाही."

"तुझ्या मैत्रिणीला ही कल्पना पसंत आहे का?"

"तिनेच सुचवलं. माझी मैत्रीण, सूझी, नर्स होती. तिचा डिव्होर्स झाला. तिने दोन मुलांना लहानाचं मोठं केलं. आता त्यांची लग्न झालीत. तिची आर्थिक परिस्थिती माझ्यासारखीच आहे."

"मुलं मदत करतात?"

"मुलगा जवळ राहतो. मधून मधून येतो. सुझी जाते. पण मुलाचीच ओढाताण होते. त्याचे हेल्थ इन्शुअरन्सला फार पैसे जातात. बायकोचा पगार हेल्थ इन्शुअरन्स आणि बेबी सिटरला जातो."

'सुझीने मुलं संभाळली तर मुलाचे बेबी सिटरचे आणि सुझीचे भाड्याचे पैसे वाचतील' असा भारतीय विचार माझ्या डोक्यात येऊन गेला.

तेव्हढ्यात जॅनेट आणि मॉली बोर्ड घेऊन कुठे तरी जाताना दिसल्या.

मी त्यांना हाक मारली. "जरा बसा. दमला असाल. चहा करते" मी म्हटलं.

"गॉड ब्लेस यू. चहा नको पण जरा बसतो. एक बातमी सांगायचीच होती" मॉली म्हणाली.

"चांगली का वाईट?" कॅरलिनने विचारलं.

"ते माहीत नाही. पण मला आज वकिलाचं पत्र आलं."

"वकिलाचं?" मी विचारलं.

"माझ्या काकाचा वकील."

कॅरलिन मोठ्यांदी हसली, "तुझा काका? किती वर्षाचा आहे? एकशे दहा?"

"काका होता" मॉली म्हणाली. "तो आता या जगात नाही."

"सॉरी. सॉरी. माझी विनोदबुद्धी चुकली." कॅरलिनने माफी मागितली.

"माझा हा काका माझ्या वडिलांचा कझिन. माझ्यापेक्षा दहाच वर्षांनी मोठा होता. गेली आठ दहा वर्ष एंफिसिमाने आजारी होता. मी शक्य तेवढी त्याला मदत केली. दोन वर्षांपूर्वी नर्सिंग होममधे पोचवला. दोन महिन्यांपूर्वी तो गेला. त्याचा मुलगा व मुलगी एकदोनदा येऊन गेली. फ्यूनरलला दोघे आले होते. माझ्या काकाने त्याचा ट्रेलर मी जिवंत असेपर्यंत मला वापरायला म्हणून दिलाय. माझी पैशांची ओढाताण होते हे काकाला माहीत होतं."

"ट्रेलरमधे राहून पैसे वाचतील का? ट्रेलरचापण खर्च असतो ना?" कॅरलिन मुक्तपणे प्रश्न विचारत होती.

"तो हिशोब वकिलाने दिलाय. ट्रेलर पार्कची फी, पाणी, वीज वगैरे धरून भाड्याच्या अर्ध्या किंमतीत भागेल. मी जॅनेटला माझ्याबरोबर चल म्हणतेय. ती विचार करतेय."

जॅनेट म्हणाली, "आम्ही दोघी एकत्र राहिलो व अर्धा खर्च प्रत्येकीने दिला तर पैसे वाचतील हे खरंय पण............"

कॅरलिन म्हणाली, "पण सारखं एकमेकीच्या वाटेत कडमडायला होईल असंच ना?"

"तसंच." जॅनेट म्हणाली, "तुम्हाला माहीत आहे का? एका जातीचे उंदीर असतात. त्यांची संख्या फार वाढली की ते कडेलोट करून आत्महत्या करतात. त्या उंदरांसारखी अमेरिकेत गरीब म्हाताऱ्यांची संख्या

फार वाढलीय! म्हणून पंचाहत्तरी झाली की गरीब म्हाताऱ्यांनी कडेलोट करून आत्महत्या करून टाकायची" जॅनेट हसली. "कल्पना छान आहे की नाही?"

कॅरलिन बोलली, "आपण असं खाली घनदाट जंगल असलेला कडा शोधू. म्हणजे बॉडी सापडणार नाही. फ्यूनरलचा खर्च वाचेल."

हे विनोद ऐकून माझ्या अंगावर शहारे यायला लागले. 'खरंच या बायका आत्महत्या करतील का काय?' अशी शंका मला येऊ लागली.

जॅनेट म्हणाली, "उत्तम कल्पना आहे. मी आता या विषयावर एक लेख लिहिते. मेडिकेअरचे आणि सोशल सिक्युरिटीचे पैसेही आपल्यामुळे खर्च होणार नाहीत."

"काहीतरी काय बोलतेस जॅनेट! माझ्याबरोबर चल. आपले दोघींचे पैसे वाचतील." मॉली बोलली. "मी आधी गेले तरी तुला माझा भाचा भाची घराबाहेर काढणार नाहीत."

मी आ वासून हे संभाषण ऐकत होते. विषय बदलण्यासाठी मी विचारलं, "हा बोर्ड तुम्ही कुठून आणला?"

"अँटिकच्या दुकानातून. तो परत करायला जात होतो." जॅनेटने सांगितलं.

"मी परत करून येऊ का?" मी विचारलं. "तुम्ही दोघी दमला असाल. मला दुकान माहीत आहे."

"गॉड ब्लेस यू" म्हणत जॅनेटने तो बोर्ड माझ्या हवाली केला आणि ती उठली, "तू माझा मोठ्ठा प्रश्न सोडवलास. आता मला स्पॅनिशचा क्लास घ्यायला जायचंय." असं म्हणत जॅनेट गेली सुद्धा.

"जॅनेट स्पॅनिश शिकतेय?" मी विचारलं.

"नाही. शिकवतेय." मॉलीने सांगितलं. ती खरंच खूप हुशार आहे. आम्ही चुकीच्या वेळी जन्मलो. स्वैपाक, मुलं सांभाळणं, नवऱ्याची करिअर, नवऱ्याच्या विद्यार्थ्यांच्या पार्ट्या अशा उद्योगांत आमचा जन्म गेला. आता या वयात जगणं कठीण झालंय."

"तुमची खूप वर्षांची ओळख आहेसं दिसतंय." मी म्हटलं.

"आम्ही शेजारणी. जॅनेटचा नवरा इंग्लिशचा प्रोफेसर, माझा हिस्टरीचा. आमचे बंगले एका ओळीत होते. तेव्हा आमची काहीच तक्रार नव्हती. आमचा वेळ मजेत जायचा. मुलांना वाढवलं, कॉलेजात पाठवलं, त्यांची फी भरली, नवऱ्याच्या पगारातले जमतील तेव्हढे पैसे सेव्हिंग्जमधे टाकले. मग नवरे रिटायर झाले. त्यांच्याबरोबर प्रवास केला. त्यात पैसे खर्च झाले. आम्हा दोघींचे नवरे वर्षा–दोन वर्षांच्या अंतराने गेले. त्यांच्या आजारात पैसे खर्च झाले. ते गेल्यावर उरले फक्त बंगले. ते विकले. इथे राहायला आलो त्याला दहा वर्ष झाली. हळूहळू साठलेले पैसे खर्च झाले. थोडे उरलेत. दोघी ते सांभाळतोय. नवऱ्याच्या अपुऱ्या सोशल सिक्युरिटीत खर्च भागवण्याचा प्रयत्न करतोय."

कॅरलिन भारवल्यासारखी वाटत होती, "माझं लग्न झालंच नाही. मी नोकरी केली पण माझी परिस्थिती फारशी वेगळी नाही. माझी मैत्रीण सुझी. तिचा डिव्होर्स झाला होता. तिने जन्मभर नर्सची नोकरी करून दोन मुलांना लहानाचं मोठं केलं. तिचीही ओढाताण चाललीय. ती आणि मी काही दिवस एका अपार्टमेंटमधे राहणार आहोत."

"अमेरिकेत बेकायदेशीरपणे साउथ अमेरिकेतून कामगार येतात. एका अपार्टमेंटमधे दहाजण मिळून राहतात. त्याबद्दल जनता तक्रार करते. आता या अमेरिकेन् बायका पण तेच करणार आहेत. एका लहानशा अपार्टमेंटमधे दोघी राहणार आहेत. ते जनतेच्या लक्षात तरी येईल का?" मी विचार करत होते.

"मी अशी निराशावादी नाही." मॉली बोलली, "पण जॅनेटची उंदरांची गोष्ट ऐकून मला कसंतरी झालं."

"मी चहा करतेच" म्हणत मी उठले.

"शमा, तू बस. मीच कॉफी करते." कॅरलिन उठली. "कॉफी पिऊन तुझ्याबरोबर तो बोर्ड परत करायला येते. थोडं चालणं तरी होईल."

अँटिकच्या दुकानात जाताना मी कॅरलिनला विचारलं, "जॅनेट आणि मॉली अफोर्डेबल अपार्टमेंटसाठी अर्ज का करत नाहीत?"

"अभिमान आडवा येतो. त्या मध्यमवर्गीय आहेत ना? गव्हर्मेंट हॅण्ड आउटस् घेणं योग्य वाटत नाही."

पैशाचा विषय कॅरलिन आणि मी कटाक्षाने टाळत होतो. तरी पण विषय निघालाच. कॅरलिनने मला पैसे वाचवण्याचे मार्ग सांगितले, "सिनियर सेंटरमधे दोन डॉलरमधे लंच. उरलेलं बांधून घरी."

"कुपनं कापायची"

"वापरलेले कपडे विकत घ्यायचे."

"रात्री मेणबत्त्या लावायच्या."

'क्लिनिकमधे जायचं. डॉक्टरच्या ऑफिसात जास्त पैसे पडतात."

परत येताना वाटेवरच्या भिंतीवर कुणीतरी एका भाषणाची जाहिरात लावली होती. ती मी वाचली – "Face of female poverty in the U.S.A."

(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप' २०११)